

देगलूर : महाविद्यालयात मानवी हक्क दिन उत्साहात साजरा करण्त आला.

# देगलूर महाविद्यालयात मानवी हक्क दिन उत्साहात

देगलूर, ता.१२ (बातमीदार) : देगलूर महाविद्यालय देगलूर पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग व संशोधन केंद्र यांच्या वतीने (ता.१०) रोजी मानवी हक्क दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय देगलूर येथील समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. मारोती बामणे यांचे मानवी हक्काचे महत्व या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

प्रा.डॉ.मारोती बामणे यांनी आपले मनोगत सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक देगलूर महाविद्यालय देगलूर पदवी व पदव्युत्तर विभाग व राज्यशास्त्र संशोधन केंद्रातील प्रा.डॉ. माधव बोले यांनी करताना मानवी हक्क म्हणजे काय? व त्याची मानवी जीवनात कश्याप्रकारे उत्पत्ती झाली याची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगितली. या कार्यक्रमास महाविद्यालय विकास समिती सदस्य व मराठी विभागातील प्रा.डॉ.सर्जेराव रणखांब आणि महाविद्यालय विकास समिती सदस्य व तत्वज्ञान विभाग प्रमुख प्रा.डॉ. संजय पाटील तसेच महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी सेलचे संयोजक व इंग्रजी विभागातील प्रा.डॉ.सुदाम एल.एच. हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.ए.तृतीय वर्षातील विद्यार्थी संदेश देशमुख यांनी केले. आभार प्रदर्शन सूक्ष्मा भोसले यांनी केले. कार्यक्रमाची सांगता लष्करातील अधिकारी यांना श्रद्धांजली वाहून करण्यात आली.